## <u>निशाणी क्र. ४७ खाली आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी कागदपत्रं दाखल करण्याकरिता केला आहे. तरी, कागदपत्रं दाखल करुन घेण्यात यावे, अशी मागणी केली. सामनेवाला क्र.१ यांनी आक्षेप नोंदविला की, कागदपत्रं मान्य नाहीत. सार्वजनिक कागदपत्रं आहेत, पुर्वीच अर्जदारांनी दाखल करणे आवश्यक होते. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा. सामनेवाला क्र.२ ते ४ यांनी आक्षेप नोंदविला की, सदर अर्जास तीव्र आक्षेप आहे. अर्जामधील कथने खोटी आहेत. अर्जदार स्वच्छ हाताने आले नाहीत. सार्वजनिक कागदपत्रं असून देखील आजपर्यंत लपवून ठेवले. अर्जदारांनी सदर कागदपत्रं शाबीत करण्याची आहेत.

०२. युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरुन असे दिसून येते की, अर्जदार मृत्युपत्र व मालमत्ता पत्रक दाखल करत आहेत. सदर मृत्युपत्र सन २००१ चे असून मालमत्ता पत्रक हे मिळकतीबाबत आहे. रोजनाम्यानुसार सामनेवाला यांना नोटीस काढण्यात आली. त्यानंतर सामनेवाले हजर झाले व आक्षेप नोंदविले. दाखल कागदपत्रं हे सार्वजनिक कागदपत्रं असल्याने, अभिलेखावर दाखल करुन घेण्यास कोणतीही अडचण नाही. सदर कागदपत्रं वादातीत आहेत, त्यामुळे शाबीत करण्याची जबाबदारी अर्जदारांवर आहे. येणेप्रमाणे अर्ज मंजुर होण्याकरिता कोणतीही अडचण नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. खर्च नियमाप्रमाणे.

PRAMOD BHAGWAN LOKHANDE
Digitally signed by PRAMOD BHAGWAN LOKHANDE
Date: 2025.12.22 16:33:18 +0530

दिनांक:– २२.१२.२०२५ (प्र. भ. लोखंडे)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, बार्शी.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Shripad N. Chilka, Steno Grade-2. |
| Court | : Civil Court Senior Division, Barshi. |
| Judgment/Order signed by the P. O. on | : 22.12.2025 |
| Judgment / Order uploaded on | : 22.12.2025 |